International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.6 July-Aug 2023

# रोकडरहित व्यवहारांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेपुढील आव्हानाचे अध्ययन

**श्री. प्रशांत सुर्यभान उगले[1], डॉ. रेखा आप्पासाहेब कढणे[2]**
[1]संशोधक, गोखले एज्युकेशन सोसायटीचे,
आर. एन. सी. कला, जे. डी. बी. वाणिज्य आणि एन. एस. सी. विज्ञान
महाविद्यालय, नाशिक रोड, जि. नाशिक
[2]मार्गदर्शक, अॅड. मनोहरराव नानासाहेब देशमुख
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर
Corresponding Author- श्री. प्रशांत सुर्यभान उगले
DOI-10.5281/zenodo.8344433

**गोषवारा –**

विरहित व्यवहारामुळे ग्रामीण भागातील जनतेला व्यवहार करणे सहज सुलभ सोपे झाले आहे. या व्यवहारामुळे रक्कम स्वतः जवळ बाळगली जात नसल्यामुळे खबरदारी घ्यावी लागत नाही. रोकड विरहित व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेत व्यवहारांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. रोकड विरहित व्यवहार कुठूनही करता येत असल्यामुळे बँकेत रांगेत उभे राहणे वेगवेगळ्या प्रकारची कागदपत्रे या अडचणी कमी होत आहेत. जवळजवळ सर्वच व्यावसायिक व ग्रामीण भागातील लोक हे व्यवहार करतात. रोकड विरहित व्यवहार करताना व्यावसायिक व्यक्ती सुशिक्षित असणे गरजेचे आहे.व्यवहार करण्याचे तांत्रिक ज्ञान असावे. निरक्षर अडाणी व्यक्तीचा येथे उपयोग नाही. रोकड विरहित व्यवहार करण्याचे व त्या माध्यमातून व्यापार करण्याचे ज्ञान संबंधित व्यक्तीला असले पाहिजे.

**प्रस्तावना -**

भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ५०० व १००० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय जाहीर केला. या नोटबंदी अर्थात निश्चलीकरण निर्णयाचा उद्देश हा भ्रष्टाचार, काळ्या पैश्याला आळा घालणे, बनावट नोटांच्या वापराला पायबंद घालणे तसेच कमीत कमी रोकड वापरणारी अर्थव्यवस्था निर्माण करणे हा होता. रोख व्यवहाराऐवजी डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, ऑनलाईन व्यवहार, ई-बँकिंग, धनादेश याद्वारे कॅशलेस व्यवहार यांचा वापर वाढविणे होय. 'डिजिटल देयक पेमेंट' सुरू करण्याचा हेतू हा मुळात ग्राहक आणि व्यापारी दोघांचा विश्वास संपादन करणे हाच आहे. डिजिटल पेमेंटच्या खर्चाची आणि शुल्काची पारदर्शकता तसेच वेळोवेळी तक्रार निवारण, ग्राहक/व्यापारी शिक्षण आणि जागरूकता या बाबी सुनिश्चित करून याबाबत विश्वास निर्माण केला जाऊ शकतो. भारत सरकारच्या मार्गदर्शनाखाली 'बँकिंग' आणि 'वित्तीय सेवा' उद्योगांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी अनेक उपाय केले आहेत. भारत सरकारने समाजातील सर्व स्तरातील विस्तारासाठी आर्थिक समावेशन करण्याचा विचारही केला आहे. 'आर्थिक समावेशन' म्हणजे जिथे लोक आपल्या दैनंदिन जीवनात विविध आर्थिक साधनांचा उपयोग करतील. आर्थिक समावेशनाचे चार मुख्य घटक म्हणजे देयक पेमेंट, कर्ज, गुंतवणूक आणि विमा हे होय. जनधन, आधार, मोबाईल या त्रिसूत्रीने डिजिटल क्रांती घडवून आणली आहे. यामुळे समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणले आहेत. देशातील सर्वसामान्य व्यक्तीही आता डिजिटल व्यवहार करू शकतात. रोकड विरहित व्यवहारांमुळे बँक आणि इतर वित्तीय संस्थांना इच्छुक व्यापारी व व्यावसायिकांची कर्ज पात्रता निर्धारित करणे आणि त्यांना कर्ज देणे शक्य होते. यामुळे बेकायदेशीर सावकारी आणि कर्जावरील न संपणारे व्याज यातून गरीबाची सुटका होऊ शकते. टेलिफोन, वीज बिल भरण्यासाठी, रेल्वे व विमानसेवा किंवा चित्रपटाचे तिकीट बुक करण्यासाठी, शाळा- महाविद्यालयांची फी भरण्यासाठी तसेच विविध वस्तूच्या खरेदी विक्रीनंतर आर्थिक रक्कम देवघेवसाठी अशा विविध कामासाठी नागरीक डिजिटल पेमेंटचा वापर करू शकतात. विविध बिल भरण्यासाठी रांगेत उभे राहण्याची गरज नाही. तसेच पैसे देताना सुद्धा सुट्ट्या पैशांची आवश्यकता भासत नाही.एका बटणावर

तपशीलवार व्यवहार उपलब्ध असल्याने क्रेडिट आणि डेबिट यांचा मेळ बसणे सुलभ होते. अलीकडील १० वर्षाच्या कालावधीमध्ये १५ ते ६० वयोगटातील ग्राहकांमध्ये इंटरनेट, स्मार्ट फोन, गुगल पे, फोन पे, भीम सारखे तत्सम विविध प्रणालीद्वारे वापर हा गुंतवणूक, बँक कर्ज हप्ते अदा करणे, तसेच विविध प्रकारचे पेमेंट करण्यासाठी अधिकच वाढलेला दिसून येतो. भारतात आर्थिक देवघेवसाठी फोन पे (PHONE PAY) ऑगस्ट २०१६, भीम (BHIM) डिसेबर २०१६ व गुगल पे (GOOGLE PAY) सप्टेंबर २०१७ पासून वापरण्यास सुरवात झाली.

**३. शोधनिबंधातील मुलभूत शब्द -** रोकड विरहित अर्थव्यवस्था, रोकड विरहित व्यवहार, बँक व्यवसाय, एकल व्यापारी, प्लॅस्टिक मनी.

**४. शोधनिबंधाचे महत्त्व -** प्रस्तुत शोधनिबंधाचे महत्त्व पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१. रोख रक्कम हाताळणीचा धोका कमी करण्यसाठी रोकड विरहित व्यवहार महत्वाचे ठरतात.

२. व्यापारी किंवा व्यावसायिक वर्गाला त्यांच्या भौगोलिक कक्षांच्या पलीकडे जाऊन व्यापार करणे शक्य होते. तसेच याद्वारे व्यापार, व्यवसाय आणि ग्राहकांची संख्या कितपत व कशी वाढवता येते हे यातून पाहिले जाणार आहे.

३. रोकड विरहित व्यवहारामुळे फायदे-तोट्यासह निर्माण झालेल्या समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी उपयोग होईल.

**५. शोधनिबंधाची उद्दिष्टे -** प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील उद्दिष्टे निर्धारित केली आहेत.

१. शेती, उद्योग, ग्रामीण कारागीर, छोटे व्यावसायिक आणि किरकोळ विक्रेते या घटकांमधील आर्थिक व सामाजिक बदल अभ्यासणे.

२. रोकड व्यवहारातील नवीन बदलांचा व्यावसायिकांवर झालेला परिणाम अभ्यासणे.

३. रोकड विरहित व्यवहारांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

**६. शोधनिबंधाची गृहितके -** प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील गृहीतकृत्ये मांडली आहेत.

१. रोकड विरहित व्यवहारामुळे किराणा व भुसार माल विक्रेते, हॉटेल व उपहार गृहे, हार्डवेअर व ट्रेडिंग, ऑटोमोबाईल, कृषी सेवा केंद्र या निवडक व्यवसायांयिकाच्या उत्पन्नात वाढ झाली.

२. रोकड विरहित व्यापारामुळे व्यवसायिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली.

**७. संशोधन पद्धती -** प्रस्तुत शोधनिबंधाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

**८.तथ्य संकलन -** संशोधन कार्यामध्ये तथ्य संकलन अतिशय महत्त्वाचे असते. तथ्य संकलनासाठी पुढील स्त्रोतांचा आधार घेतला आहे .

**अ) प्राथमिक स्त्रोत -** प्राथमिक स्त्रोतमध्ये प्रश्नावली आणि मुलाखती यांचा वापर केला आहे. तसेच नाशिक विभागातील विविध रोकड विरहित व्यवहारामुळे किराणा व भुसार विक्रेते, हॉटेल व उपहार गृहे, हार्डवेअर व ट्रेडिंग , ऑटोमोबाईल, कृषी सेवा केंद्र या निवडक व्यवसायांवर क्षेत्रातील व्यावसायिकांकडून नमुना प्रश्नावलीच्या आधारे सखोल माहिती संकलित केली आहे .

**ब) दुय्यम स्त्रोत -** दुय्यम स्त्रोतांमध्ये प्रकाशित व अप्रकाशित माहितीचा वापर केला आहे.संशोधन अहवाल, रिझर्व्ह बँकेचे वार्षिक अहवाल, संदर्भ ग्रंथ पुस्तके, मासिके, त्रैमासिके, वर्तमानपत्र, इंटरनेटवरील ई-स्त्रोत यांचा वापर करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीचे व आकडेवारीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण केले आहे .

९. **नमुना निवड -** नमुना निवड केलेल्या प्रत्येक व्यावसायिकांचा २५ इतका नमुना घेतला आहे. किराणा व भुसार माल विक्रेते, हॉटेल व उपहार गृहे, हार्डवेअर व ट्रेडिंग, ऑटोमोबाईल, कृषी सेवा केंद्र या व्यावसायिकांचा एकूण १२५ नमुना घेतला आहे.

**१०.आव्हाने -** रोकडरहित व्यवहारांच्या दिषेने जाण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. कॅपलेस इकॉनॉमीचा नारा स्वागतार्ह असला तरी वास्तवतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आज पहरात कॉलनी- कॉलनीत बँका आणि एटीएम सेंटर असली तरी, ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्था आजही पुरेषा प्रमाणात पोचलेली नाही. दुसरीकडे खातेदारांच्या प्रमाणात बँकांत कर्मचारी नसल्याने किरकोळ कामासाठी घेतक-याला बँकांत अनेक खेटे घालावे लागतात. कॅपलेसकडे जाण्यापूर्वी ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्थेचे जाळे विस्तारणे आणि बँकिंग व्यवस्था सक्षम करणे आवश्यक आहे. भारताला खेडयांचा देव म्हणून संबोधले जाते. म्हणजेच एक मोठा अनौपचारिक गट जो भारतातील लोकसंख्येचा प्रमुख घटक आहे, तो अजुनही रोख रकमेवर चालतो. कॅपलेस अर्थव्यवस्थेसाठी सरकारी प्रोत्साहन अद्याप सिद्ध झाले नाही आणि बाजारात अजुनही रोख रक्कम आहे. डिजीटल देयके वाढवण्यासाठी चांगले इंटरनेट कनेक्टव्हीटी आणि हॅकर्स विरुद्ध सुरक्षा लोकांना प्रदान केली जावी यासह अधिक्षीत आणि दुर्गम भागात राहणा-या लोकांना डिजीटल माध्यमांचा वापर करण्याचे प्रषिक्षण दिले पाहिजेत.

१. भारतामध्ये फार मोठया प्रमाणात रोखीने चलन फिरत असते. चलनातील या रकमेचे प्रमाण भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या १३ टक्के इतके आहे.

२. मुख्यतः रोखीनेच व्यवहार करणे जवळ जवळ ९५ टक्के व्यवहार हा रोखीनेच केला जातो. फार मोठया प्रमाणातील असंघटित क्षेत्रातील रोजगार हा रोखीनेच दिला जातो. या करीता डिजीटल साक्षरतेची आवष्यकता नसते.

३. एटीएमचा वापर प्रामुख्याने रोखीने पैसे काढण्याकरीता केला जातो. आणि इतर ऑनलाईन व्यवहार टाळले जातात. एटीएमचा ९२ टक्के वापर हे रोखीने पैसे काढण्याकरिताच केले जातात.

४. विक्रीच्या मूलस्थानी साधनाची कमतरता रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणे १.४४ दषलक्ष ठिकाणी विक्रीच्या मूलस्थाणी यंत्रणा अस्तित्वात आहे. ही यंत्रणा अनेकविधी ठिकाणी बँकानी सुरू केली आहे, असे जुलै २०१६ च्या अहवालात नमूद केले आहे. यातील बहुतेक यंत्रणा ही बहरी किंवा निमपहरी विभागात आहे.

५. डिजिटल व्यवहारासाठी इंटरनेट जोडणी आवश्यक असते. ग्रामीण भारतात अल्प इंटरनेट जोडण्या आहेत. याच्या जोडीला गरीबी आणि अविक्षीतता याही समस्या आहेत. या सर्वांमुळे प्लॅस्टिक मनीच्या व्यापक व्यवहारावर मर्यादा येत आहेत.

६. भारताची लोकसंख्या १३१ कोटी इतकी आहे. यापैकी ७० कोटी लोक ६ लाख ३८ हजार खेडयात वास्तव्य करतात. ग्रामीण भागात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या कमी आहे. सायबर कॅफे वीज कनेक्टीव्हीटी इत्यादी सेवा पुरेषा प्रमाणात व सातत्याने उपलब्ध होत नाही. तसेच अज्ञान व अधिक्षीतपणा यामुळे कँपलेस व्यवहार दुसऱ्या कडून प्राप्त करून घेतात. त्यामुळे धोक्याचे प्रमाण वाढते व काही वेळा आवश्यक असणारी गोपनियता राहत नाही.

**सारांश –**

अलीकडच्या काळात रोख पैशाचे व्यवहार कमी झाले असून विविध साधनामुळे रोकड विरहित व्यवहारांत वाढ होत असल्याचे दिसते. या व्यवहारांचा किराणा व भुसार वस्तू व माल विक्रेते, हॉटेल व उपहार गृहे, हार्डवेअर व ट्रेडिंग, ऑटोमोबाईल, कृषी सेवा केंद्र यांवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी सदर संशोधन गरजेचे आहे. संगणकीय बँकिंग प्रणालीचा व्यवहारांवर झालेला परिणाम या संशोधनातून पाहिला आहे . भारतात लहान-मोठे उद्योग व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहेत. विशेषत: ग्रामीण भागातही ते व्यापार व व्यवसाय विखुरलेले आहेत. प्रस्तुत संशोधनातून सर्व क्षेत्रातील व्यवहार आधुनिक बँकिंग मधील रोकड विरहित व्यवस्थेचा झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी संशोधन होणेही गरजेचे आहे.

**संदर्भ सूची -**

१. कप्तान संजय आणि जॉन्सन बोर्जेस,(जानेवारी २०१३),डायमंड वाणिज्य कोश, खंड १, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

२. आगलावे प्रदीप, (जानेवारी २०००), “संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे,” विद्या प्रकाशन, नागपूर.

३. महाजन मुकुंद, (२०१८), भारतातील बँक कायदे आणि व्यवहार, निराली प्रकाशन, पुणे.

४. दत्त सुंदरम,(६८ वी आवृत्ती २०१३), भारतीय अर्थव्यवस्था, एस चांद पब्लिकेशन, नवी दिल्ली.

५. योजना–विकास समर्पित मासिक (फेब्रुवारी २०१७) वर्ष ४४, अंक ७, भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालय, प्रकाशन विभाग, नवी दिल्ली.